डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# कृषि महाविद्यालय, दापोली, जि.रत्नागिरी

जा.क्र.कृमविदा/आस्था/अ—२/३७९१/२०२१, दिनांक : 15 SEP 2021

## जाहिरात

कृषि महाविद्यालय, दापोली या आस्थापनेवरील 'औषधनिर्माता' हे पद रूपये २०,०००/— (रूपये वीस हजार) मात्र द.म. एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता भरावयाचे आहे. सदर पदाकरीता इच्छूक उमेदवारांनी सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली या कार्यालयात या जाहिरातीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अर्ज सादर करण्यात यावेत. त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर पदाकरीता एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण, इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, एम.एस.ब्रँच यांनी विहित केलेली फार्मासिस्ट/कंपाऊंडर परीक्षा उत्तीर्ण किंवा शासनमान्य प्राप्त संस्थेतून फार्मासी पदविका उत्तीर्ण किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक ही शैक्षणिक अर्हता असून निम्नस्तरीय शैक्षणिक अर्हतेच्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

२. उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे तर राखीव प्रवर्गासाठी किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे.

३. सदर पदाची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असून त्याचा कालावधी ११ महिन्यांचा आहे.

४. उमेदवारास ११ महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी काम सोडायचे असल्यास त्याने तशी आगाऊ सूचना न दिल्यास त्यांच्याकडून १ महिन्याच्या ठेक्याची रक्कम वसूल करण्यात येईल.

५. या आदेशान्वये कंत्राटी पध्दतीवर घेतलेल्या सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

६. औषध निर्माता यांनी विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या दवाखान्यात दररोज सकाळी ९.०० ते १.३० व दुपारी २.३० ते सायं. ६.०० या वेळेत साप्ताहीक व कार्यालयीन सुट्टया धरून विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय आणि विद्यार्थी—विद्यार्थीनी यांना सेवा पुरवावयाच्या आहेत. याबाबत विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी यांचेकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्यांची सेवा त्वरीत समाप्त करण्यात येईल.

७. औषध निर्माता यांचेसाठी सकाळी ९.०० ते १.३० व दुपारी २.३० ते ६.०० अशी वेळ जरी निर्धारित करण्यात आली असली तरी आकस्मिक व तातडीच्या प्रसंगी औषध निर्माता यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत कोणत्याही वेळी विद्यापीठातील रूग्णांना वैद्यकीय सुवीधा उपलब्ध करून देताना हजर रहावे लागेल. तसेच औषध निर्माता यांना दापोली मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

८. सर्वोच्च न्यायलयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र.एस.एल.पी—५४५३/९० च्या निर्णयाच्या अनुषंगाने कंत्राटी कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

९. या आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रू.१०० च्या स्टॅम्प पेपरवर लिहून देऊन संबंधित उमेदवारांनी ते हजर होतेवेळी सादर करावे. तद्नंतर ही नेमणूक ही नेमणूक कार्यान्वीत होईल.

तसेच औषध निर्माता या पदासाठी स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. ईच्छूक उमेदवारांनी आपला अर्ज वैयक्तिक माहिती शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्रांसह निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयास दिनांक २९.०९.२०२१ पर्यंत सादर करावा.

(यु.व्ही.महाडकर)

**सहयोगी अधिष्ठाता**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
जिल्हा– रत्नागिरी

दिनांक रोजीच्या विद्यापीठ जाहिरातीला अनुसरुन करावयाचा अर्ज

उमेदवाराचा पासपोर्ट

आकाराचा फोटो

# अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जाहिरातीतील ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव | : | |
| २ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | |
| ३ | सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता | : | |
| ४ | कायमचा पत्ता | : | |
| ५ | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र. | : | |
| ६ | जन्मतारीख (अंकी व अक्षरामध्ये) | : | |
| ७ | अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकाच्यावेळी असलेले वय | : | वर्षे महिने दिवस |
| ८ | धर्म/जात | : | |
| ९ | शैक्षणिक अर्हता | : | |

| अ. क्र. | उत्तीर्ण परीक्षेचे नांव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/ श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Letter Head

१०) अनुभव : वर्ष महिने दिवस

| अ. क्र. | नियुक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | कालावधी | | | | | नोकरी सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून (दिनांक) | पर्यंत (दिनांक) | एकूण कालावधी | | | |
| | | | | | वर्ष | महिने | दिवस | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

११) उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची माहिती :

मी श्री/श्रीमती........................................................ असे लिहून देतो/देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून ती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास उपरोक्त पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी

**टिप : अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रत केलेल्या असाव्यात. जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८–अ, दि.०९.०३.२०१५ अन्वये विहित नमुन्यातील स्वयंसाक्षांकनाचे स्वयंघोषणापत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे.**

Letter Head